# महाराष्ट्र शासन

क्रमांक: एमआरडी-३३१६/प्र.क्र.५५/नवि-७
नगर विकास विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु
चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ०७ मार्च, २०१७.

प्रति ,
सभापती,
नागपूर सुधार प्रन्यास,
नागपूर.

विषय : नागपूर महानगर प्रदेशासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थापनेबाबत

महोदय,

राज्यातील महानगर प्रदेश क्षेत्रातील कोणत्याही भागाचा योग्य, शिस्तबध्द आणि जलद विकास करण्याच्या अनुषंगाने महानगर प्रदेश क्षेत्रातील नियोजन प्राधिकारी किंवा महानगरपालिका किंवा नगर पालिका/ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून विविध विकास योजना / प्रकल्प राबविताना सुसूत्रता राहावी तसेच संबंधित महानगर प्रदेशाच्या भागाचा योग्य, शिस्तबध्द आणि जलद विकास करण्याकरिता मुंबई महानगर प्रदेशा व्यतिरिक्त राज्यातील अन्य प्रत्येक महानगराकरीता महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थापन करण्याच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेशविकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या धर्तीवर महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ३) दि. १०.०१.२०१७ रोजी अधिनियमीत झाला आहे.

०२. महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश, २०१६ (सन २०१७ चा महा.३) चे कलम ३चे उपकलम (१) नुसार नागपूर महानगर प्रदेश क्षेत्रासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थापन करण्यासाठी अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र असाधारण भाग-१ मध्ये उप विभाग असाधारण क्रमांक २२ अन्वये दिनांक ०४ मार्च, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील कलम १२(१) नुसार महानगर आयुक्तांची नियुक्ती राज्यशासनाने करावयाची आहे.

०३. या अनुषंगाने आपणास असे कळविण्याचे निदेश आहेत की, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नियमित महानगर आयुक्तांची नियुक्ती होईपर्यंत सद्यस्थितीत सदर पदाचा कार्यभार सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी पहावा.

आपला,

सोबत : वरीलप्रमाणे.

(श्रीराम यादव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीस्तव सादर
मा. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

D:\YGD०५११२१५\YGD ०४०११३\mmrdaletter २०१६.docx